सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577

**Website:** www.jdroamt.org **Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/ 2189

दिनांक :- 03 AUG 2023

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील साठी थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी (CAP) रिक्त जागांची गणना करुन नोंदणी करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १.मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक :- २अ/एडीएम/DSE-DSP Vacancy/२०२३/४४७ दिनांक १/८/२०२३.
२.या कार्यालयाचे कार्याययीन आदेश क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/१८७७ दिनांक २६/७/२०२३.
३.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २/एनजीपी/वि.सं.ब./२०२३/६८४ दिनांक १ ऑगष्ट २०२३.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाचे संदर्भिय कार्यालयनी आदेश क्रमांक २ अन्वये थेट व्दितीय वर्षाच्या प्रवेशासाठी रिक्त जागांची परिगणना करुन ती माहिती दिनांक **२६/०७/२०२३** रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत आपल्या पोर्टलवर भरुन कन्फर्म करण्याबाबत तसेच **अभियांत्रिकी पदवी संस्थांनी दिनांक २७/०७/२०२३ रोजी तसेच औषधनिर्माणशास्त्र पदवी संस्थांनी दिनांक २८/०७/२०२३ रोजी** सदर प्रवेशाबाबत जाणकार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी या कार्यालयास आवश्यक कागदपत्रासह हजर राहुन कन्फर्म करण्याबाबत सुचविलेले होते त्याप्रमाणे आपणामार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ, अमरावती यांच्यामार्फत व्दितीय सत्र अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचा निकाल उशिराने म्हणजेच दिनांक ३०/७/२०२३ रोजी लागल्याने सदर अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्यांचे संस्थाबदल व पाठयबदल करता आलेले नव्हते. परंतु आता मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे संदर्भ पत्र क्रमांक ३ अन्वये संस्थाबदल व पाठयक्रम बदल करण्यास मुदतवाढ दिलेली असल्याने आपल्या स्तरावरुन वरील बांबीबाबत दिलेल्या मुदतीत कार्यवाही करावी.

तसेच आपणास कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर आपल्या संस्थेची थेट व्दितीय वर्षाच्या प्रवेशासाठी रिक्त जागांची पुनश्च: परिगणना करुन अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांनी सदर माहिती **दिनांक ७/०८/२०२३** रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत आपल्या पोर्टलवर भरुन कन्फर्म करुन **संस्थांनी दिनांक ८/०८/२०२३ रोजी** सदर प्रवेशाबाबत जाणकार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी या कार्यालयास हजर राहुन या कार्यालयाचे लॉगीनमधून कन्फर्म करुन घ्यावे तसेच औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात येते की, त्यांचे माहितीमध्ये काही बदल करावयाचा असल्यास त्यांनी तसा बदल करुन सदर अभ्यासक्रमाच्या संस्थांनी **दिनांक ९/०८/२०२३ रोजी** सदर प्रवेशाबाबत जाणकार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी या कार्यालयास हजर राहुन या कार्यालयाचे लॉगीनमधून कन्फर्म करुन घ्यावे. सदर माहिती प्रवेशासबंधी असल्याने याबाबत कालमर्यादेत कार्यवाही करुन त्यामध्ये काही चुक होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यामध्ये भविष्यात काही चुक झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी आपली राहील, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

तसेच अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदवी संस्थांना कळविण्यात येते की, आपणास संस्थाबदल, पाठयक्रमबदल किंवा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करावयाचे असल्यास सदर कार्यवाही करण्याचे दृष्टीने आपले लॉगिन अनलॉक करण्याकरीता या कार्यालयाचे प्रोग्रामर, श्री. निलेश इंगळे (९६५७ ७१५२७०) यांच्याशी संपर्क साधून अनलॉक करुन घ्यावे.

**(डॉ. वि.रं. मानकर)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी तसेच त्यांना कळविण्यात येते की, वरील नमुद संस्थांना माहितीमध्ये बदल करावयाचा असल्यास अश्या संस्थांना त्यांचे पोर्टल मुदतीच्या आत अनलॉक करुन द्यावे.